**बिनतारी संदेश**

प्रति:— सर्व ठाणेदार चंद्रपूर जिल्हा/राखीव पोलीस निरीक्षक पो.मु.चंद्रपूर, दंगा नियंत्रण पथक, पोलीस कल्याण विभाग, स्था.गु.शा, तिविशा, वाहतुक शाखा, मो.प.वि. चंद्रपूर, नागरी सुविधा केंद्र चंद्रपूर, सायबर सेल , सुरक्षा शाखा चंद्रपूर, नक्षल सेल चंद्रपूर नविअ(सि—६०) , बिडिडीएस, आर्थीक गुन्हे शाखा, जलद प्रतिसाद पथक चंद्रपूर, वाचक शाखा अ.पो.अ. , वाचक शाखा पो.अ चंद्रपूर अर्ज तकार शाखा, महीला सहाय्यक कक्ष, श्वान पथक चंद्रपूर , श्वान पथक राजुरा, फिंगर प्रिंट कार्यालय वायरलेस विभाग चंद्रपूर सि.सि.टी.एन.एस चंद्रपूर, ना.ह.स चंद्रपूर, मसुप चंद्रपूर दविअ पथक चंद्रपूर, दहशतवाद विरोधी पथक चंद्रपूर

पासुन :— पोलीस अधिक्षक चंद्रपूर

चंद्रपूर दि. ९.४.२०२०

क्रमांक :— पोअचं/एसबी—१/अ.रजा—मंजुर/२०२०

चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील नेमणुकीस असलेले सफौ ते पोलीस शिपाई ( **निलंबित कर्मचारी वगळुन** ) १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस अर्जित रजा समर्पित करण्याची सन २०२०—२०२१ या वित्तीय वर्षाकरीता खालील अटीचे अधीन राहुन मंजुरी देण्यात येत आहे. (रजा मंजुर करण्यास या कार्यालयास वेगळा अर्ज सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.)

१) प्रभारी अधिकारी यांनी आपले पोस्टे/उपपोस्टे /पोलीस चौकी ,येथील कर्मचारी यांचे कडुन अर्जित रजेचे अर्ज घेवुन त्यांच्या जेष्ठतेप्रमाणे व आवश्यकते प्रमाणे कॅलेंडर तयार करून मंजुर असलेल्या १५ दिवस अर्जित रजेवर सोडण्यात यावे.

२) मंजुर असलेल्या अर्जित रजेवर सोडल्यानंतर कर्मचारी रजा उपभोगुन हजर होताच उपभोगलेल्या रजेबाबतचा सविस्तर अहवाल कार्यालयास न चुकता सादर करावा.

३) १५ दिवस अर्जित रजेचे रोखीकरण करण्यासाठी कर्मचारी इच्छुक असल्यास प्रभारी अधिकारी यांनी कर्मचारी यांचे कडुन अर्ज प्राप्त करून अर्जाची यादी तयार करून ते अर्ज आपले अभिप्रायासह कार्यालयास सादर करावे.

४) कर्मचारी यांचे रजा लेखा खाती अर्जित रजा शिल्लक असल्यास १५ दिवस अर्जित रजेचे रोखीकरण मंजुर करण्यात येईल रजा शिल्लक नसल्यास रोखीकरण होणार नाही व तसे कर्मचा—यास कळविण्यात येईल.

५) कर्मचारी यांना अर्जित रजा न उपभोगता रोखीकरण करावयाचे असल्यास रजा न उपभोगता १५ दिवस अर्जित रजेचे रोखीकरण करण्याबाबत अर्ज प्रभारी अधिकारी यांनी प्राप्त करून यादी तयार करून आपले अभिप्रायासह यादी या कार्यालयास मंजुरीस सादर करावी.

६) आपले पोस्टे ला अर्जित रजा तसेच रोखीकरणा बाबत प्राप्त झालेल्या अर्जाची नोंद रजिस्टरला अद्यावत करण्यात यावी. जेणे करून कोणत्याही कर्मचारी यांचे दोन —दा रजा रोखीकरणाचे अर्ज प्राप्त होणार नाही. याबाबत प्रभारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

(डॉ. महेश्वर रेड्डी )
पोलीस अधिक्षक चंद्रपूर

Scanned with CamScanner